सत्य सर्वांचे आदिघर ।
सर्व धर्मांचे माहेर ॥धृ.॥
जगांमाजी सुख सारे ।
खास सत्याची ती पोरे ॥१॥
सत्य सुखाला आधार ।
बाकी सर्व अंधःकार ॥
आहे सत्याचा बा जोर ।
काढी भंडाचा तो नीर ॥२॥
सत्य आहे ज्याचें मूळ ।
करी धूर्तांची बा राळ ॥
बळ सत्याचे पाहुनी ।
बहुरुपी जळे मनी ॥३॥
खरें सुख नटा नोव्हे ।
सत्य ईशा वर्जू पाहे ॥
जोती प्रार्थी सर्व लोकां ।
व्यर्थ डंभा पेटुं नका ॥४॥



Mahatma Jyotirao Phule & Savitribai Phule

# Universal Truth Marriage Ceremony

# सत्यशोधक विवाह समारंभ

# सत्यशोधक विवाह समारोह

18 February 2007

## Acknowledgement and Submission

Mahatma Jotirao Phule developed and introduced the Satya Shodhak Marriage Ceremony. Inspired by this meaningful, gracious and dignified method of marriage we decided to adapt it for my daughter Paulomi's marriage held on the 27 th of December 2002.

After consulting many renowned personalities and keeping the spirit of the original ceremony in mind we made appropriate changes to it so that the ceremony becomes acceptable today.

Dr. Nirmala Sarda converted the original English draft made by me into Hindi. She also made appropriate changes to the Ceremonial Song written by Mahatma Phule and with her own inputs rewrote them as the Hindi version. Suresh Mate (MANS activist) translated the English version into Marathi language. Prof. Adhik Deshmukh transformed the Ceremonial Song, written for the Hindi version, into the Marathi version. Please note these were not translations as such. We are indebted to them for their gracious help.

We also thank Dr. Narendra Dabholkar, Chief Executive of the Maharashtra Anddhashraddha Nirmoolan Samiti (Committee for the Eradication of Superstitions). Shri. Hari Narke, Editor of Mahatma Jotirao Phule's literature, published by the Government of Maharashtra and Shri. T. S. Raskar, Executive President of the Pune City MANS unit, for their valuable guidance and assistance.

Now I have made appropriate changes to the marriage ceremony and to the translations, again with the help of the people mentioned above.

I am grateful to My daughter Urvashi and son in law Dinesh, to Dhuneerow and Nirmala Luximon and the Luximon family, to my mother Vatsalabai, my wife Pratima and my family members for helping me to perform the marriage ceremony in this Satya Shodhak method (The Universal Truth method) I am also grateful to those others who have helped me directly or indirectly in this endeavour. I hope that the young generation while performing their Marriage Ceremonies appreciates and adopts this meaningful and dignified method of marriage, handed down to us by Mahatma Jotirao Phule.

**Deepak J. Girme**
18 th February 2007



## UNIVERSAL TRUTH MARRIAGE CEREMONY

**Introduction :**

*"Truth is the essence of Universal life. The essence of Religion..*
*All happiness in this world, Is the offspring of eternal truth.*
*All (human) Happiness depends on truth. In its absence there is only unhappiness and Darkness.*
*Truth is almighty. (so)it easily exposes untruth and deceit .—*
*Only truth prevails".*

Mahatma Phule, who wrote the above in Marathi prose, devoted his entire life in the search of truth. Later Mahatma Gandhi too, followed in his footsteps. Mahatma Phule established Sarvajanik Satya Dharma (The Universal religion of Truth) in 1873. Later he wrote the book called 'Sarvajanik Satya Dharma' in the year 1889.

According to him there is only one creator or Nirmik and he being Omnipresent, Omnipotent, Omniscient that is Sarvavyapi, Sarvashaktiman, Sarvadnya; he is present in everyone. Since he is the creator of everything in this universe, humans have nothing to offer him, which is not created by him. Hence the only thing that can be offered to him is good deeds and conduct by humans towards other human beings and towards everything that he has created. According to Mahatma Phule, prayers or material goods cannot appease the creator. According to him, one should help the handicapped, the downtrodden, and all beings and things created by him, which includes conservation of nature. that is plants, animals, etc.
Mahatma Phule was a great visionary and a social reformer. His work has no parallel in the history of modern India.

Brothers and sisters, in his lifetime, Mahatma Phule undertook another wonderful task, he re-established the local ceremonies of the aboriginal people of Maharashtra. In his book titled 'Sarvajanik Satya Dharma' he has given methods to perform rituals from birth till death. They are simple and meaningful and adapted from age old customs and rituals practiced by the aboriginal people of Maharashtra, Karnataka and Andhra Pradesh. He vehemently opposed all superstitions, inequality and of misdeeds conducted in the name of religion. He was against people who used god as a commodity to earn a livelihood. Some may say that religion is important to prevent immoral behaviour in society, but Mahatma Jotirao Phule said that religion should not be used to deceive and fool gullible god fearing people nor should useless and undignified rituals and customs be followed which lower the sanctity and dignity of all human beings and the Creator himself.

His revolutionary thoughts have given strength and honour to the social history of Maharashtra and will help generations even in the 21 st century to follow in his foot steps in the Search of Truth.

## Universal Truth (Satya Shodhak) Marriage Ceremony

This marriage ceremony is based on the Marriage ceremonies, performed by the majority of local people of the Deccan, mostly from Maharashtra, Karnataka and Andhra Pradesh.

### The Ceremony

**1) Welcome :**

Five prominent and elderly representatives from the brides and bridegrooms side are invited to the dais and felicitated by people of both the parties by offering them garlands, shawls etc. and are introduced to all the guests.
The master of ceremonies ,the singers etc are also felicitated and introduced to the guests.

**2) Ushering of Bride and Bride groom :**

The master of ceremonies requests the brides and bride grooms maternal uncle and aunt, and friends to usher the couple on to the stage.
They are introduced to the guests.

**3) Lighting of the ceremonial fire :**

The ceremonial fire in the ceremonial vessel is lighted by the master of ceremonies.
Small pieces of Sandal wood are given to the bride and bridegroom and they are requested to put them in the lighted fire and asked to take this vow:-

*"We now banish from our minds all negative and evil thoughts, so that we can perform our marriage ceremony with pure and clear minds. As a symbolic gesture we offer these Sandal wood to the fire. Now all our evil and bad thoughts are burnt in the fire and as the fragrance of burning Sandal wood pieces sweetness the air, our minds shall become purified."*

**4) Seven Vows (Seven Steps) :**

The master of ceremonies then requests the, bride and groom to hold hands and walk side by side (not one after the other) around the ceremonial fire seven times and take seven vows as follows during each round.

1. *First round* : We will devote our lives with love and care for each other.
2. *Second round* : We will protect and try to conserve all life created by the creator and help the week and helpless to the best of our ability.
3. *Third round* : We will treat each other and every human being with honour and respect.
4. *Fourth round* : We shall never discriminate on the bases of race, religion, cast or gender.
5. *Fifth round* : We shall always respect dignity of labour and. work hard to fulfil our lives dreams and become useful and helpful human beings.
6. *Sixth round* : We shall think rationally and strive to keep our bodies and minds healthy.



सत्यशोधक विवाह समारंभ

7. *Seventh round* : We shall strive to become healthy, wealthy and wise so that we have the capability and worth to look after and groom the new life which we may bring into this world.

**5) Marriage Ceremonial Song :**

The master of ceremonies will then request the bride and the bridegroom to sit on chairs placed on the dais. The master of ceremonies, along with the singers will then start reciting the Ceremonial Song.

This will be recited in the traditional style. After every verse of the Ceremonial Song she will recite 'Shubha Mangal Savadhan'. Friends and close relatives standing on the dais and sitting in the front rows around the dais will shower flower petals onto the bride and bridegroom.

**The meaning of this Ceremonial Song is given here in brief**

• The bride says -
*"Give me love darling treat me as your partner*
*Always strive for the betterment of each other*
*Never undermine the status of a woman*
*Always remember that the wife is the driving force of every husband".*
• The bridegroom says -
*"Other women are like my sisters you only my darling*
*In the presence of everyone today I have made you my own.*
*We are like the wheels of our family chariot*
*Let us keep them rolling together to enable us to reach our destiny".*
• The bride and bridegroom say together -
*"We together will move ahead on the road to progress.*
*We will keep superstitions at bay and walk the road of truth*
*We will remember to keep the honour of our family society and country*
*If we commit any mistakes we will correct them promptly".*
• The people who have gathered to bless the couple will say-
*"Today you begin your married life, always be happy*
*We wish you to always progress in your life*
*We wish you to always speak the truth and do good deeds in your life.*
*We wish you to always work to honour your parents and society*
*We wish you always leaded a happy and successful life*
*Always remember to do good deeds in your life.*
*These are our good wishes to you on this happy occasion.*
*We wish you both happiness and prosperity throughout your life.*
*Blessings to you, blessings for your happy and prosperous wedded life".*

**6) Oath :**
After this the master of ceremonies will request the bride and bridegroom to repeat an oath.

- **The Bride will say -**

*"In the presence of all present today and with the remembrance of the creator, I take this oath- that form today I accept you as my husband. I shall always treat you with love and respect. I shall always be there with you in your sorrow and in your happiness. I shall remain loyal to you and love you forever".*

- **The Bridegroom will say -**

*"In the presence of all present today and with the remembrance of the creator, l take this oath - that form today I accept you as my wife. I shall always treat you with love and respect. I shall always be there with you in your sorrow and in your happiness. I shall remain loyal to you and love you forever."*

**7) Exchange of the garlands :**
The Master of ceremony will handover the garlands and bouquets to the bride and bridegroom. The bride and bridegroom will now Garland each other and present bouquets to each other.

**8) Exchange of the Necklaces :**
The Bridegroom will put the necklace around the neck of the bride; the bride will then offer the Bridegroom a chain to be worn around his neck.

The master of ceremonies will then declare that the bride and bride groom are married.

**9) Vote of Thanks :**
Master of ceremonies will then request the bride and the bridegroom to thank everyone present.

The bride and the bridegroom will thank the master of ceremonies and all present with folded palms and say that they thank every one for being present for their marriage and for giving them their blessings.

The marriage ceremony will end.





**Benefits of the Universal Truth Marriage Ceremony**

1. This method encourages inter-cast, inter- religious, marriages. Thus helping to eradicate the evils of cast system and helps religious harmony.
2. Opposes the Dowery System which causes injustice and brings tremendous unhappiness and misery to women.
3. Opposes the unscientific Astrology , matching of horoscopes, conducting marriages on so claimed auspicious days and time etc.
4. This marriage can be conducted on any convenient day of the year and at any convenient time.
5. Making unwarranted silly egoistic demands and creating fuss over non fulfilment of the same are not considered gracious in this dignified marriage ceremony.
6. This marriage ceremony is very meaningful, comprehensible and simple.
7. Any respectable person can conduct this ceremony. A priest is not necessary. Saves Time and Money.
8. The vows of commitment to be equal and loyal and the oath the couples take helps them to enter into a healthy relation for life.

This marriage ceremony is not drab like many registered marriages. There is a meaningful ritual in which every one participates and enjoys.

# सत्यशोधक पद्धती - विवाह समारंभ

**परिचय व प्रास्ताविक :**

**सत्यशोधकी विवाहाची वैशिष्टये व फायदे**

सत्य सर्वांचे आदिघर । सर्व धर्माचे माहेर ॥
जगांमाजी सुख सारे । खास सत्याची ती पोरे ॥
सत्य सुखाला आधार । बाकी सर्व अंधःकार ॥
आहे सत्याचा बा जोर । काढी भंडाचा तो नीर ॥ .....

वरील अखंड आहे, महात्मा जोतीराव फुले यांचा. महात्मा गांधींप्रमाणेच महात्मा फुलेसुद्धा सत्याच्या शोधात व्यग्र होते. इसवी सन १८७३ मध्ये महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा जोतीराव फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना केली. पुढे काही काळाने सन १८८९ साली सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक नावाचा ग्रंथ लिहिला.

महात्मा फुल्यांच्या मते, या सृष्टीचा एक निर्मिक आहे. तो सर्वव्यापी, सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान आहे. प्रत्येकाच्या हृदयात त्याचा वास असतो. या जगातील प्रत्येक वस्तू त्याच्यामुळेच बनलेली आहे. अर्थात मनुष्यप्राणी त्याला कोणतीच वस्तू अर्पण करु शकत नाही, की जी त्याच्यामुळे बनलेली नाही. या कारणामुळेच आपआपसांत बंधुभाव राखणे आणि नेहमी सत्कर्म करीत रहाणे हेच सर्वांचे परमकर्तव्य ठरते. दुःखी, कष्टी व पिडलेल्या लोकांची सेवा करणे, सर्वांना प्रेम वाटणे अशाच गोष्टी तो त्या सर्वशक्तिमानाला अर्पण करु शकतो. फुल्यांच्या मतानुसार जप, तप, पूजा-अर्चा अथवा पंचमहाभूतांतील वस्तू अर्पून त्या निर्मिकाला संतुष्ट करता येणे शक्य नाही. यापेक्षा नम्रता आणि प्रेमाबरोबर अपंग, शोषित पिडलेल्या व अन्यायग्रस्तांना मदत करावी आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, प्राणिमात्रांचे संरक्षण करावे व नियंत्रणकर्त्याच्या सृष्टीचे संतुलन राखावे.

बंधु-भगिनींनो, महात्मा फुल्यांनी अजून एक महत्वपूर्ण कार्य केले आहे. प्राचीन काळापासून जे संस्कार आणि रिवाज जनजीवनात चालत आलेले होते, त्यांची पुनर्रचना केली. फुल्यांच्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात जन्मापासून मृत्यूपर्यंत विधी आणि रिवाजांची पद्धत वर्णिलेली आहे. महत्मा फुले धर्माआड चालत असलेल्या अधार्मिक गोष्टींच्या आणि अंधश्रद्धांच्या कट्टर विरोधी होते. आपण चांगल्या प्रकारे हे जाणून आहात, कोणत्याही समाजाच्या नैतिक वा आध्यात्मिक उन्नतीसाठी, समाजस्वास्थ्यासाठी धर्माची नितांत गरज असते. पण धर्माचा आधार विषमता असू नये. अंधश्रद्धा आणि अर्थहीन कर्मकांड हे असू नयेत. गैरलागू गोष्टींना त्याच्यात स्थान असू नये या गोष्टीवर त्यांनी जोर दिला आहे. त्यांच्या क्रांतिकारी विचारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाला शक्ती दिली. एकविसाव्या शतकात लोकांना त्यांचा विचार नेहमी सत्याच्याच मार्गाने जगण्याची प्रेरणा देत राहील, यात जराही संशय नाही.





**सत्यशोधक विवाह समारंभ - विवाह संस्कार :**

विवाह संस्कार ! सोळा संस्कारात प्रमुख संस्कार मानला जातो. सत्यशोधक विवाह संस्कार दक्षिण भारतातील (महाराष्ट्र, कर्नाटक तसेच आंध्र प्रदेश) प्रचलित विवाहपद्धतीवर आधारित आहे.

**विवाह सोहळा**

१) **स्वागत :**

वरपक्षाकडील पाच व वधूपक्षाकडील पाच प्रमुख व्यक्तींना विवाहमंचावर आमंत्रित केले जाते. त्यांची ओळख करून दिली जाते. पुष्पगुच्छ देऊन, स्त्री-पुरुषांचा सन्मान केला जातो. वधूपक्षाप्रमाणेच वरपक्षाच्या घरच्यांचाही सन्मान केला जातो.
समारंभाचे विधीप्रमुख, गायक इ. व्यक्तींचीही ओळख करुन सन्मानित केले जाते.

२) **आगमन :**

विधीप्रमुख वधू-वरांच्या मामा-मामींना व मित्रमैत्रीणी वधूला व वराला विवाह मंचावर घेऊन येण्याची विनंती करतात. वधू-वर मंचावर आसनस्थ झाल्यानंतर विधीप्रमुख त्यांचा थोडक्यात परिचय करुन देतात.

३) **अग्निप्रज्वलन :**

अग्निकुंडातील अग्नी प्रज्वलित केला जातो.

विधीप्रमुख वधू-वरांच्या हातात चंदनाच्या छोट्या समिधा देतात व त्या अग्नीत टाकावयास सांगतात. त्यानंतर ते वधू-वरांना खाली निर्देशित केलेली आश्वासने मोठ्याने म्हणण्याचा अनुरोध करतात.

**आश्वासन :**

'चंदनाच्या समिधा आम्ही अग्नीला यासाठी समर्पित करीत आहोत की, आमच्या मनातील सर्व कुविचार व वाईट भावना अग्नीत जळून भस्म व्हाव्यात आणि चंदनाच्या समिधा जळाल्याने सर्वत्र पसरणारा सुगंधित सुवास जणू आमच्या अंतःकरणाच्या पावित्र्याचेच द्योतक असेल. हा सुगंध साक्ष देईल की, आम्ही निर्मळ मनाने आमच्या वैवाहिक जीवनाची सुरुवात केली आहे.'

४) **सप्तपदी : सात प्रतिज्ञा**

विवाहाचे एक महत्वपूर्ण अंग म्हणजे सप्तपदी. अग्नीच्या साक्षीने वधू-वर मिळून सात फेरे घेतात. एका मागे एक असे दृश्य असणार नाही. (दोघे बरोबरीने चालतील). प्रत्येक फेरीबरोबर सार्थ प्रतिज्ञा कराव्या लागतात की, ज्यामुळे दोघांचे वैवाहिक जीवन आनंदी, समृद्ध, यशस्वी, तसेच मंगलमय व्हावे.

विधीप्रमुख सूचना करतात - वधू-वरांनी एक दुसऱ्याचा हात हातात घेऊन सात फेरे बरोबरीने चालावेत. प्रत्येक फेरीबरोबर प्रतिज्ञा दिली जाईल. वधू-वर त्याचा पुनरुच्चार करतील.

**१ ली फेरी** : आम्ही आमचे जीवन स्नेह आणि प्रेमासह एक दुसऱ्यासाठी समर्पित करु.
**२ री फेरी** : आम्ही सृष्टिनिर्मात्याने बनवलेल्या सर्व जीवमात्रांचे संरक्षण आणि संवर्धन करु. दुर्बल, अनाथ, असहाय्य प्राणिमात्रांना यथाशक्ती मदत करु.
**३ री फेरी** : आम्ही एक दुसऱ्यांना नेहमी आदर आणि सन्मान देऊ.
**४ थी फेरी** : जाती, धर्म, वंश किंवा लिंग यावर आधारलेल्या भेदभावांचा आम्ही त्याग करु. आम्ही स्वतः मनुष्य आहोत आणि मानवताच स्वीकारु.
**५ वी फेरी** : परिश्रम करणारांना आम्ही प्रतिष्ठित मानतो. मेहनत करुन आम्ही आमचे जीवन सफल आणि समृद्ध बनवू. आमचा परिवार, समाज व देश यांचे नाव उज्ज्वल करु.
**६ वी फेरी** : आम्ही विवेकपूर्ण तसेच तर्कनिष्ठ आचार आणि विचार ठेवू. आम्ही आमचे शरीर निरोगी आणि सक्षम ठेवू, ज्यामुळे आमची बुद्धीसुद्धा निरोगी व सतेज राहील.
**७ वी फेरी** : आम्ही आमचे तन - मन - धन समृद्ध करू. तसेच आम्ही जन्म देणाऱ्या नव्या जीवाचे अतिशय उत्तम पालन - पोषण करण्यास स्वतःला सक्षम बनवू.

**५) मंगलगीत :**

विधीप्रमुख वधू - वरांना मंचावरील खुर्च्यांवर बसण्यास सांगतील. गायक मंगलगीत म्हणतील. प्रत्येक कडव्याबरोबर 'शुभमंगल सावधान' म्हटले जाईल, तेव्हा लोक पुष्पपाकळ्यांची वृष्टी वधू - वरांवर करतील. (सर्व लोकांना पुष्पपाकळ्या आधीच वाटल्या जाव्यात.) ही मंगलगीते म. फुले यांच्या मूळ आशयाशी सुसंगत पद्धतीने लिहिली आहेत.
मंगलगीत

**वधूने म्हणावे -**

आयुष्यभर देऊनि प्रेम तू, साथी मला मानावे
परस्परांच्या उन्नतीस्तव सदैव प्रयत्नशील रहावे।
स्त्रियांचे अधिकार ते कधीही नको झिडकारू
पत्नी असे पुरुषांची प्रेरणा हेही नको विसरू !॥
(शुभमंगल सावधान)

**वराने म्हणावे -**

अन्य स्त्रिया मज बहिणीसम तू एकच माझी प्रिया
श्रेष्ठांच्या साक्षीने आज तुला वरिले सभामंडपी मी या।
दोन चाके आहोत आपण संसारूपी या रथाची
त्याला गती द्यावया हवी, मजल गाठण्या ध्येयाची।
(शुभमंगल सावधान)





**दोघांनी एकत्र म्हणावे -**

दोघे मिळून आम्ही उन्नती करीत सदैव पुढे राहू
अंधश्रद्धांना दूर ठेवून, नेहमी सत्याच्या मार्गाने जाऊ।
परिवार, समाज अन् देशाच्या सन्मानाचे राखू आम्ही ध्यान
चूक एखादी झालीच हातून तर सजग ठेवू आपुले भान।

उपस्थित लोकांच्याकडून काव्यमय शुभाशीर्वाद

**गायिका १.**

विवाहबद्ध झालात आज तुम्ही सर्वदा सुखी रहा।
तुमची प्रगती ही होत राहो, जीवनात यशस्वी व्हा॥

**गायिका २.**

सत्कर्मरत राहून सदा साच अन् मधुर वाणी ठेवा।
मातृ-पितृ ऋणाबरोबर समाजऋणातूनही मुक्त व्हा॥

**गायिका १.**

सुखी, संपन्न, समृद्ध सर्वदा जीवन तुमचे व्हावे।
आयुष्यभर सदा सर्वदा सत्य कर्म करीत रहावे॥

**गायिका २.**

हेच आमुचे शुभाशीर्वाद तुम्हा या मंगलसमयी।
जीवनातील प्रत्येक वळण व्हावे तुम्हा सुखदायी॥
(शुभमंगल होवो, शुभमंगल होवो, हा विवाह शुभमंगल होवो.)

मंगलगीत संपल्यानंतर वधू-वर पुढील शपथा घेतील.

**६) शपथ :**

**वर शपथ घेतो :** ''मी सर्वांसमक्ष व निर्मिकाचे स्मरण करुन अशी शपथ घेतो की, मी आजपासून पत्नी म्हणून तुझा स्वीकार करतो. मी सदैव प्रेमाने व आदराने तुझा सन्मान राखीन व सर्वकाळ तुझ्याशी एकनिष्ठ राहून तुला सुखी ठेवेन.''

**वधू प्रतिज्ञा घेते :** ''मी सर्वांसमक्ष व निर्मिकाचे स्मरण करुन अशी शपथ घेते की, मी आजपासून पती म्हणून तुझा स्वीकार करते. मी सदैव प्रेमाने व आदराने तुझा सन्मान राखीन. तुझ्या सर्व प्रकारच्या सुख-दुःखात एकरुप होईन व सर्वकाळ तुझ्याशी एकनिष्ठ राहून तुला सुखी ठेवीन.''

**७) हार घालणे :**

शपथ संपताच विधीप्रमुख वधू-वरांच्या हाती पुष्पहार देतील. वधू-वर एक दुसऱ्यास पुष्पहार घालतील व एकमेकांस पुष्पगुच्छ भेट देतील.

प्रथम वधू वराला हार घालेल.

मग वर वधूला हार घालेल.

**८) मंगळसूत्र / चेन घालणे :**

'वर वधूला मंगळसूत्र घालेल आणि वधू सोन्याची चेन वराला घालेल.'

**९) आभार :**

आज आम्ही दोघे आपल्या सर्वांच्या उपस्थितीत सत्यशोधकी पद्धतीने विवाहबद्ध होत आहोत. आमचे सहजीवन आजपासून सुरु होत आहे. आमच्या आनंदात आपण सर्व सामील झालात आणि आम्हाला शुभाशीर्वाद दिलेत, याबद्दल आम्ही आपले अंतःकरणापासून आभारी आहोत.

**सत्यशोधक विवाहपद्धतीची वैशिष्ट्ये :**

१) या पध्दतीमध्ये आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहास अनुमती दिलेली आहे. जाती-पाती, धर्म-वर्ण नष्ट करणे, हे या विवाह पद्धतीचे खास वैशिष्टय आहे. या पध्दतीमुळे समाजात खऱ्या अर्थाने एकजूट होते.

२) हुंडयासारख्या अनिष्ट प्रथा नष्ट होतात आणि स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, हुंडाबळीसारख्या अनिष्ट प्रकारांना बाधा येते.

३) या पध्दतीमध्ये ज्योतिषशास्त्राला (अवैज्ञानिकतेमुळे) विरोध केलेला आहे. ग्रहयोग, कुंडली, तिथी-बितीसारख्या फालतू गोष्टींमध्ये वेळ व पैसा खर्च केला जात नाही.

४) वर्षभराच्या ३६५ दिवसांपैकी कोणत्याही सोयीस्कर दिवशी सोयीच्या वेळेला विवाह होऊ शकतो.

५) या विवाह पध्दतीत रुसणे-फुगणे, मान-पानासारख्या गोष्टींना थारा नसल्याने लग्नात कोणत्याही प्रकारची अडचण येत नाही.

६) या विवाह पध्दतीत लग्नविधी अतिशय सोपे व अर्थपूर्ण असतात.





७) कमीत कमी वेळ व पैसा खर्च होतो. आजच्या महागाई व विज्ञानयुगामध्ये ही पध्दत सर्वांत सोपी व सुविधापूर्ण वाटते. कोणी ब्राम्हण वा पुरोहिताची आवश्यकता असत नाही. कोणीही सत्पात्री व्यक्ती विवाह लावू शकतात.

८) या विवाह पध्दतीमधील हुंडयाचा त्याग सामाजिकदृष्टया अतिशय महत्वपूर्ण आहे.

९) सहजीवनाचा प्रारंभच त्यागाने सुरु होत असल्याने पती-पत्नीमध्ये सच्चे प्रेम फुलते आणि संसार सुखाचा होतो.

१०) नोंदणी पध्दतीच्या विवाहासारखा कोरडेपणा यात नसतो तर विवाह उत्सवी स्वरुपात करु शकता. आप्त, मित्र परिवार आणि समाजाच्या उपस्थितीत सर्वांच्या शुभाशीर्वादामुळे सर्वच वातावरण आनंदमयी राहते.

✻ ✻ ✻ ✻ ✻

## सत्यशोधक पद्धति से विवाह समारोह

**परिचय एवं प्रास्ताविक :**

सत्य सबका आदि घर है। धर्म हो सत्य का वर।
है जगत् में सत्य सबकुछ। सत्य ही केवल अमर।
आसरा है सत्य सुख का। शेष तो तम दुःख का।
सत्य है सबसे प्रबलतम। सत्य ही है सबसे प्रबलतम। .....

प्रस्तुत काव्यपंक्तियाँ हैं महात्मा जोतीराव फुले की ! महात्मा गांधी की भाँति महात्मा फुले भी आजीवन सत्य की खोज में जुटे हुए थे। इसवी सन १८७३ में महाराष्ट्र के मशहूर समाजसुधारक महात्मा जोतीराव फुलेजी ने सार्वजनिक सत्यधर्म की स्थापना की। आगे चलकर सन १८८९ में आपनें 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक नामक ग्रंथ लिखा।

फुलेजी के मतानुसार इस सृष्टि का एक निर्माता है।
वह सर्वव्यापी, सर्वज्ञ और सर्वशक्तिमान है। हर एक के हृदय में उसका वास होता है ॥ इस जगत् की हर चीज उसीने बनाई है। अतः मनुष्य उसे ऐसी कोई भी वस्तू अर्पन नहीं कर सकता, कि जो उसने नहीं बनाई हो। इसी कारण आपस में भाईचारा बनाये रखना और हमेशा सत्कर्म करते रहना - यही उसका परम कर्तव्य बनता है। दुःखितों और पीडीतोंकी सेवा करना, सबको प्यार बांटना.... यही तो वह अर्पण कर सकता है उस सर्वशक्तिमान को ! फुलेजी के अनुसार जप, तप, पूजापाठ अथवा पंचमहाभूतात्मक वस्तुएँ अर्पण करके निर्माता को संतुष्ट नहीं किया जा सकता। उससे तो बेहतर यही है कि विनम्रता और प्यार के साथ अपाहिज़, शोषित, पीडित, अन्यायग्रस्तों की सहायता करें और पर्यावरण का संरक्षण करें, प्राणीमात्रों की हिफ़ाजत करें और नियंता की सृष्टि का संतुलन बनाये रक्खें।

भाईयों और बहनों, महात्मा फुलेजी ने एक और अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य किया है। प्राचीन काल से जो संस्कार और समारोह जनजीवन में चलते आये थे, उनकी पुनर्रचना की है। फुलेजी की 'सार्वजनिक सत्य धर्म' पुस्तक में जन्म से लेकर मृत्यू तक की विधियों और संस्कारों की व्यवस्था बताई गई है। फुलेजी धर्म की आड में चलने वाले अधर्म और अंधविश्वासों के कट्टर विरोधी थे। आप यह बात भलीभाँति जानते थे कि किसी भी समाज की नैतिक तथा आध्यात्मिक उन्नति के लिए, उसकी स्वस्थता के लिए धर्म की अत्यंत आवश्यकता होती है। किंतु धर्म का आधार विषमता न हो, अंधविश्वास और अर्थहीन कर्मकांड न हो, बेमतलब की बातों को उसमें ज़रा भी स्थान न हो। इन बातोंपर उन्होने जोर दिया था। उनके क्रांतिकारी विचारों ने महाराष्ट्र के सामाजिक इतिहास को शक्ति तथा गरिमा प्रदान की। इक्कीसवीं सदी में जी रहे लोगों को उनके विचारों की यह बिरासत हमेशा सत्यपथ पर चलने की प्रेरणा देती रहेगी, इसमें तनिक भी संदेह नहीं है।

## ❊ सत्यशोधक विवाह समारोह ❊

सत्यशोधक विवाह संस्कार दक्षिण भारत (महाराष्ट्र, कर्नाटक एवं आंध्र प्रदेश) के जनजीवन में प्रचलित विवाह पद्धति पर आधारित है।

### विवाह - समारोह

**१) स्वागत व परिचय :**

वर पक्ष की ओर से पाँच प्रमुख व्यक्ति एवं कन्या पक्ष की ओर से पाँच व्यक्तियों को मंच पर बुलाया जाता है। परिचय कराया जाता है। पुष्पहार पहनाकर, पुरुषों का सम्मान किया जाता है तथा महिलाओं को भी कुंकुम - तिलक लगाकर पुष्पगुच्छ दिए जाते हैं।

वधूपक्ष की भाँति वरपक्ष भी कन्या के घरवालों का सम्मान करते है। उपस्थितों को इन सबका संक्षेप में परिचय कराया जाता है।

समारोह के विधीप्रमुख गायक आदि व्यक्तियों का भी परिचय कराके उन्हें सम्मानित किया जाता है।

**२) आगमन :**

विधिप्रमुख : वधू - वर के मामा-मामी एवं अन्य रिश्तेदारों, सहेलियाँ और दोस्तों को बिनती करते हैं कि वे वर वधू को मंच पर ले आयें।

वर-वधू मंच पर बिराजमान होने के पश्चात् संक्षेप में उनका परिचय विधीप्रमुख प्रस्तुत करता है।

**३) अग्नि प्रज्वलन :**

होमकुंड में अग्नि प्रज्वलित किया जाता है।





विधिप्रमुख वधू-वर के हाथों में चंदन की छोटी छोटी समिधा देते हैं। तत्पश्चात् वे वधू-वर को निम्नलिखित आश्वासन उच्च स्वर में बोलने का अनुरोध करते हैं -

**आश्वासन :**

'चंदन की ये समिधाएँ अग्नि को हम इसलिए समर्पित कर रहे हैं कि हमारे मन में स्थित सभी कुविचार एवं दुर्भावनाएँ अग्नि में जलकर भस्म हो जाय और चंदन की समिधा जलने के कारण जो सुगंधित वायु सर्वत्र फैलेगी वह मानों हमारे अंतःकरण की पवित्रता का द्योतक है। यह सुगंध गवाही दे रही है कि हम निर्मल मन से अपने वैवाहिक जीवन की शुरुआत करेंगे।'

**४) सप्तपदी : सात प्रतिज्ञा**

विवाह का एक महत्त्वपूर्ण हिस्सा याने सप्तपदी। अग्नि की साक्षी में वधू-वर सात फेरे लगाते हैं। ये सात फेरे वधू-वर साथ-साथ मिलकर लगायेंगे। एक आगे, एक पीछे ऐसा दृश्य नहीं होगा। हर प्रदक्षिणा के वक्त सारगर्भित संकल्प लेने पडते हैं, ताकि दोनों का वैवाहिक जीवन आनंदमय समृद्ध, यशस्वी एवं मंगलमय हों।

विधिप्रमुख सूचना करता है - वधू - वर एक दूसरे का हाथ थामकर सात फेरे साथ-साथ लगायें। हर फेरे के साथ जो प्रतिज्ञा दिलाई जाएगी, वधू-वर उसको दुहरायेंगे -

**फेरा १ :** हम हमारा जीवन स्नेह और प्यार के साथ एक दूसरे के लिए समर्पित करेंगे।

**फेरा २ :** हम सृष्टि रचियता के बनाये हुए हर जीवमात्र का संरक्षण और संवर्धन करेंगे। दुर्बल और बेसहारा, असहाय प्राणिमात्र की यथाशक्ति मदद करेंगे।

**फेरा ३ :** हम हमेशा एक दूसरे को आदर और सम्मान देंगे। औरों के साथ भी आदर और सम्मानपूर्वक बर्ताव करेंगे।

**फेरा ४ :** जाति, धर्म, वंश तथा लिंग पर आधारित भेदभाव को हम अस्वीकार करेंगे। हम स्वयं मनुष्य है और मनुष्यता (मानवता) को ही सर्वोपरी समझेंगे।

**फेरा ५ :** परिश्रम करनेवालों को हम प्रतिष्ठित मानते हैं। मेहनत करके हम हमारे जीवन को सफल एवं समृद्ध बनायेंगे। अपने परिवार, समाज तथा राष्ट्र का नाम रोशन करेंगे।

**फेरा ६ :** हम विवेकपूर्ण एवं तर्कनिष्ठ आचार-विचार रक्खेंगे। हम अपने शरीर निरोगी और सक्षम बनाये रक्खेंगे जिससे हमारा मस्तिष्क भी निरोगी तथा तेज रहेगा।

**फेरा ७ :** हम हमारे तन, मन, धन को समृद्ध करके एक नये संतान को दुनिया में जन्म देंगे और उसका बढिया ढंग से पालनपोषण करने लायक स्वयं को बनाएँगे।

गायक मंगलगीत गायेंगे। हर पद के बाद 'शुभमंगल सावधान' बोला जाएगा। तब लोग फुलों की पंखुडीयों की वृष्टि वधू-वर पर करेंगे। (सब लोगों को पुष्प पंखुडियाँ पहलेही बाट देनी चाहिए)

**५) मंगलगीत :**

**१. वधू कहे -**

देना तू स्नेह, दुलार मुझको, साथी मुझे मानना
एक दूसरे की तरक्की हेतु, सदैव प्रयत्नरत रहना।
नारी के अधिकारों को तू, कभी न मुझसे छीनना
पत्नी है प्रेरणा पुरुष की, इस बात को याद रखना।
(शुभमंगल सावधान)

**२. वर कहे -**

अन्य नारियाँ मेरी बहनें, तू एक है मेरी प्रिया
सभी परिजनों के समक्ष, आज तुझको मैनें वर लिया।
हम दोनों हैं गृहस्थीरुपी रथ के दो पहिए
मंजिल तक पहुँचने हेतु, पहिए गतिशील रखने चाहिए।
(शुभमंगल सावधान)

**दोनों मिलकर -**

हम पति-पत्नी मिलकर, बढेंगे उन्नति के पथ पर
अंधश्रद्धाओं से रहकर परे, बढेंगे सत्य की राह पर।
परिवार, समाज और देश के, सम्मान का रखेंगे हम ध्यान
भूल कोई होवें हमसे तो, सतर्क करना अपना जान।
(शुभमंगल सावधान)

उपस्थितों की ओर से काव्यमय शुभाशीर्वाद -

**गायिका १ :**

हुए विवाहबद्ध तुम आज, रहना खुश सर्वदा
प्रगतिपथ पर बढतेही रहना, तुम सदा सर्वदा ॥

**गायिका २ -:**

वाणी बोलो मधुर और सत्कर्म करते रहो
मातृपितृ ऋण के संग समाजऋण भी चुकाते रहो ॥

**गायिका १ :**

सुखी, संपन्न जिंदगी जीना तुम सर्वदा
नेक कामों में लगे रहना तुम सदा सर्वदा ॥





**गायिका २ :**

यही हमारी शुभकामना है इस मंगल अवसर पर
रहना खुश तुम दोनों जिंदगी के हर मोड पर ॥

**दोनो गायक :**

शुभ मंगल हो, शुभ मंगल हो, यह शादी तुम्हारी शुभ मंगल हो।

**६) शपथ :**

**वर शपथ लें -**

''मैं निर्माता का स्मरण करते हुए आज आप सबके सम्मुख शपथ ग्रहण करता हूँ कि, आज से मैं तुम्हें अपनी पत्नी कबूल करके स्वीकार करता हूँ। मैं हमेशा तुम्हें प्यार, आदर तथा सम्मान प्रदान करूंगा। तुम्हारे हर सुख - दुःख में सहभागी होकर आजीवन तुम्हें खुश रखूँगा। हम हमेशा एकनिष्ठ रहेंगे।''

**वधू प्रतिज्ञा करें :**

''मैं निर्माका का स्मरण करते हुए आज आप सबके सम्मुख शपथ ग्रहण करती हूँ कि, आजसे मैं तुम्हें अपना पति स्वीकार करती हूँ। मैं सदैव तुम्हें प्यार, आदर तथा सम्मान प्रदान करूंगी। तुम्हारे हर सुख - दुःख में सहभागी होकर आजीवन तुम्हें खुश रखूंगी। हम हमेशा एकनिष्ठ रहेंगे।''

७) **पुष्पहार का भेट :** शपथ समाप्त होते ही विधीप्रमुख वधू-वर को पुष्पहार देंगे। और वधु-वर एक दूसरे को वह पुष्पहार पहनायेंगे। पुष्पगुच्छ एक दूसरेको प्रदान करेंगे।

८) **चेन पहनाना :** वर वधू को मंगलसूत्र पहनाएगा और वधू वर को चेन पहनाएगी।

**९) आभार :**

आज हम दोनों आप सबकी उपस्थिती में, सत्यशोधक पद्धतिसे विवाहबद्ध हुए हैं। हमारा सहजीवन आज से प्रारंभ हो रहा है। हमारी खुशी में आप सभी सम्मिलित हुए और हमें शुभाशीर्वाद प्रदान किए - इसके लिए हम आपके बहुत आभारी हैं।

**सत्यशोधक विवाह की विशेषताएँ एवं लाभ**

१) इस पद्धति में अंतरजातीय, अंतरधर्मीय विवाह करने की अनुमति दी गई है। जात-पात और धर्मभेद नष्ट करना इस विवाह पद्धती की खास विशेषता है। इससे समाज सही अर्थों में एकजुट होता है।

२) दहेज जैसी अनिष्ट रुढ़ियाँ नष्ट होती हैं और स्त्रियोंपर होनेवाले अन्याय, अत्याचार, दहेजबलि जैसे प्रकार रोके जाते हैं।

३) इस पद्धति में ज्योतिषशास्त्र को (अवैज्ञानिकता के कारण) विरोध किया जाता है। ग्रहयोग, कुंडली, तिथी-मिती आदि फालतू बातों में समय और पैसा खर्च नहीं किया जाता।

४) सालभर के ३६५ दिनों में से किसी भी सुविधाजनक दिन, सुविधाजनक समयपर विवाह किया जा सकता है।

५) इस विवाह में रुठना, मान-पान करना आदि बातों को पूरी तरह से बंदी होने से शादी-ब्याह में किसी प्रकार की विघ्न-बाधाएँ नहीं आती।

६) इस पद्धती में विवाहविधी बहुत आसान एवं अर्थपूर्ण होता है।

७) कम से कम समय एवं पैसा खर्च होता है। महंगाई और विज्ञान युग में यह पद्धती सबसे आसान और सुविधापूर्ण लगती है। किसी ब्राह्मण या पुरोहित की आवश्यकता नहीं होती। कोई भी सुपात्र व्यक्ति विवाह लगा सकता है।

८) इस विवाह पद्धती में दहेज का त्याग सामाजिक दृष्टीसे बहुत महत्वपूर्ण होता है।

९) सहजीवन का प्रारंभ ही त्याग से शुरु होता है।

१०) रजिस्टर विवाह जैसी शुष्कता यहाँ पर नहीं होती, बल्कि विवाह को उत्सव के रुप में संपन्न किया जा सकता है। मित्रों, रिश्तेदारों और समाज की उपस्थिती तथा सबके शुभाशीर्वाद के कारण मधुर माहौल बनता है।



# ऋणनिर्देश आणि निवेदन

महात्मा जोतिराव फुल्यांनी सत्यशोधकी विवाह पद्धतीची ओळख करुन दिली आहे. या अर्थपूर्ण, आनंददायी व आदरमय विवाहपद्धतीने प्रेरित होऊन आम्ही आमची पहिली मुलगी पौलोमी हीचा विवाह दि. २७ डिसेंबर २००२ रोजी सत्यशोधक पद्धतीने साजरा केला.

याकरिता अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या सल्ल्याअंती आणि या पद्धतीच्या विवाहातील मूळ गाभा लक्षात घेऊन आम्ही या सोहळ्यात कालसुसंगत बदल करत त्याला सर्वमान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

डॉ. निर्मला सारडा यांनी मी लिहिलेल्या मूळ इंग्रजी टिपणाचा हिंदी वृत्तांत रुपांतरीत केला आहे. त्यांनी महात्मा फुल्यांनी लिहिलेल्या विवाह गीतात स्वरचित शब्दांची भर घालत हिंदी रुपांतर केले आहे. अंनिसचे कार्यकर्ते सुरेश माटे यांनी इंग्रजी टिपणाचे मराठी रुपांतर केले आहे. प्रा. अधिक देशमुख यांनी हिंदी विवाह गीताचे मराठीत रुपांतर केले आहे. मात्र ही काही निव्वळ भाषांतरे नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. आम्ही त्यांच्या या मोलाच्या मदतीबद्दल ऋणी आहोत.

आम्ही डॉ. नरेंद्र दाभोलकर (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष) श्री. हरि नरके (महाराष्ट्र राज्य शासनाच्या महात्मा फुल्यांच्या वाङ्मय प्रकाशनाचे संपादक), श्री. टी. एस. रासकर (महाराष्ट्र अंनिस, पुणे शाखेचे कार्याध्यक्ष) या सर्वांचे त्यांच्या बहुमोल मार्गदर्शन व मदतीप्रित्यर्थ आभारी आहोत.

आता आम्ही या विवाह पद्धतीत आणि रुपांतरात वरील सन्माननीयांच्या मदतीने आणखी सुसंगत बदल केले आहेत. व माझ्या दुसऱ्या मुलीचा म्हणजे उर्वषीचा विवाह दिनेश लक्षीमॉन बरोबर १८ फेब्रुवारी २००७ रोजी करण्याचे ठरविले आहे. याबद्दल माझी मुलगी उर्वशी, जावई दीनेश, माझे व्याही धनिराव तसेच विहिण निर्मला लक्षीमॉन व लक्षीमॉन कुटुंबिय, माझी आई वत्सलाबाई, माझी पत्नी प्रतिमा आणि आमचे कुटुंबिय व अन्य सभासदांचे मदतीने हा सत्यशोधकी विवाह (वैश्वीक सत्य विवाह पद्धती) संपन्न होण्यास मदत केल्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे. या समारंभास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या अनेक व्यक्तींचाही मी मनापासून आभारी आहे. मी आशा करतो की तरुण पिढी महात्मा फुल्यांच्या या अर्थपूर्ण व आदरणीय विवाह पद्धतीतील आशय, महत्व समजून घेईल. त्यांच्या विवेकी पर्यायाला विचारपूर्वक दाद देईल व अनुकरण करेल.

फेब्रुवारी १८, २००७

**दीपक गिरमे**
१०, निशीगंध, सुंदरराव रेगे मार्ग,
ऑफ लेन नं. १४, प्रभात रस्ता,
पुणे - ४११ ००४.